## A)भारतीय राज्यघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी:

## (Historical Background of Indian Constitution)

### 1.1) संविधान सभा आणि मसुदा समितीची निर्मिती आणि कार्य :

### (Formation and functioning of Constituent Assembly and Drafting Committee)

आधुनिक शासन संस्था ही लोककल्याणासाठी कार्य करणारी राजकीय यंत्रणा असल्याचे मानले जाते त्यासाठी पर्याप्त अधिकार व कार्य असलेले एक विशिष्ट स्वरूपाचे सरकार निर्माण करण्याची गरज निर्माण होते. संविधान म्हणजे असा दस्तऐवज ज्यामध्ये शासनाची स्वरूप तसेच नागरिक आणि शासन यांच्यातील संबंधांची निश्चिती आणि वर्णन करणाऱ्या कायद्यांचा आणि नियमांचा समावेश असतो. (A constitution is a document containing laws and rules which determine and describe the form of the government the relationship between the citizens and the government.) यानुसार राज्यघटना दोन प्रमुख बाबींशी संबंधित असते एक विविध स्तरावरील शासनामधील संबंध व दोन शासन आणि नागरिक यामधील संबंध. राज्यघटना ही शासन संस्थेचा मूलभूत कायदा असते घटनेत शासन संस्थेने साध्य करावयाची उद्दिष्टे दिलेली असतात तसेच तिच्यात घटनात्मक आराखड्याची म्हणजेच विविध स्तरावरील शासकीय संरचनेची आणि अंगांची तरतूदही केलेली असते त्यामुळे देशाच्या शासनामध्ये घटना अत्यंत मूलभूत असते.

**“साधारणतः एखाद्या सार्वभौम लोकशाही देशाची घटना तयार करण्याचे कार्य लोकांच्या प्रतिनिधिक संस्थेमार्फत पार पाडले जाते .घटनेवर चर्चा करून ती स्वीकृत करण्याच्या उद्देशाने लोकांनी निवडून दिलेल्या अशा संस्थेला संविधान सभा असे संबोधले जाते.”**

*** खालील बाबींमुळे घटना निर्मितीस पोषक वातावरण निर्माण झाले.**

1. भारतीयांना आधुनिक मूल्यांची ओळख झाली. उदा. कायद्याचे राज्य, मानवतावाद, धर्मनिरपेक्षता, व्यक्तिस्वातंत्र्य इत्यादी.

2. देशात आधुनिक शासनसंस्थेचा पाया रोवला (इ.स. 1765 ते 1947 या कालावधीत झालेल्या विविध कायद्यांमधून ही शासनरचना आकारास आली).

3. भारतीय समाजात राष्ट्रवादाचे बीजारोपण झाले (भौगोलिक व प्रशासकीय ऐक्य, आधुनिक मूल्यांची ओळख व प्रसार, धर्म व समाज सुधारणा यांमुळे).

4. स्वातंत्र्य प्राप्तीकरिता स्वातंत्र्य चळवळ सुरू झाली.

## *संविधान सभा आणि संविधान सभेची मागणी :

**(Constituent Assembly and Demand for Constituent Assembly)**

* **स्वतंत्रपूर्व काळातच भारतासाठी संविधान सभेची मागणी करण्यात आली.**

**1)** 5 जानेवारी 1922 ला महात्मा गांधी (यंग इंडियात) यांनी भारताचे स्वराज्य ही ब्रिटिश संसदेने दिलेली भेटवस्तू असणार नाही. म्हणजेच "भारतीय संविधान हे भारतीय जनतेच्या इच्छेनुसार असेल." असे नमूद केले.

2) 8 फेब्रुवारी 1924 मध्ये मोतीलाल नेहरू यांनी स्वराज्य पक्षाच्या वतीने केंद्रीय विधीमंडळात ठराव मांडला व भारतासाठी एक संविधान असावे, असे नमूद केले.

3) 19 मे 1928 रोजी मोतीलाल नेहरू समिती - नेहरू रिपोर्ट (सादर 10 ऑगस्ट 1928) अंतर्गत संविधान निर्माण करण्यासाठी भारतीयांनी केलेला पहिला प्रयत्न.

4)1929 मध्ये मानवेंद्रनाथ (एम. एन.) रॉय यांनी भारतासाठी पहिल्यांदा संविधान सभा (घटना समिती) गठीत करण्याची मागणी केली.

5) डिसेंबर 1929 मध्ये - कॉँग्रेसचे अधिवेशन (लाहोर) - 'संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव' पारित करण्यात आला.

6) 1933 मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतासाठी एक प्रातिनिधिक घटना समिती असावी, असे मत व्यक्त केले.

7) 18 जून 1934 मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेस पंडित नेहरूंच्या घटना समितीच्या मागणीचा कॉंग्रेसने अधिकृतपणे आपल्या प्रस्तावात समावेश केला. तेव्हापासून घटना समितीची मागणी कॉंग्रेसची मुख्य मागणी बनली.

8) 1935 ला राष्ट्रीय कॉंग्रेस संविधान सभेची अधिकृतरीत्या मागणी जाहीर केली.

9) 8 ऑगस्ट 1940 मध्ये ऑगस्ट घोषणा याद्वारे भारतीय घटना निर्मितीसाठी घटना समिती असावी, हे अप्रत्यक्षपणे मान्य केले .

10) 1942 मध्ये क्रिप्स मिशन ने संविधान निर्मितीची जबाबदारी पूर्णपणे भारतीयांची हे तत्व मान्य केले.

11) 14 जून 1945 मध्ये वेव्हेल योजनात घटनानिर्मिती सभेला पाचारण करणे केले त्याकरिता सिमला येथे 25 जून ते 14 जुलै 1945 दरम्यान परिषद बोलाविली पण ती अयशस्वी ठरली.

12) शेवटी 1946 मध्ये  कॅबिनेट मिशन (घोषणा) मध्ये भारताची घटना समिती तयार करण्याची पद्धत आणि प्रक्रिया निश्चित झाली.

## * कॅबिनेट मिशन :

1. ब्रिटनचे पंतप्रधान क्लेमेंट ॲटली (1945-51) यांनी 19 फेब्रुवारी 1946 रोजी आपल्या कॅबिनेटमधील तीन सदस्यांना भारतात पाठविण्याची घोषणा केली. यालाच कॅबिनेट मिशन म्हटले जाते.

2. पंतप्रधान ॲटली यांनी 16 मे 1946 रोजी ब्रिटिश संसदेच्या सामान्य सभागृहासमोर ही योजना मांडली. कॅबिनेट मिशनने केलेल्या कोणत्याही शिफारशीवर सर्व पक्षीय सहमती झाली नाही.

# कॅबिनेट मिशनचे सदस्य:

अ. लॉर्ड पॅथिक लॉरेन्स (भारत सचिव)

आ. सर स्टॅफोर्ड क्रिप्स (व्यापार मंडळाचे अध्यक्ष)

इ. ॲलबर्ट व्ही. अलेक्झांडर (नौसेनेचे पहिले लॉर्ड) (फर्स्ट लॉर्ड ऑफ ॲडमायरॅलिटी)

3.त्यांचे आगमन 23 मार्च 1946 रोजी कराची येथे तर दुसऱ्या दिवशी 24 मार्च 1946 रोजी नवी दिल्ली येथे.

4 कॅबिनेट मिशनची उद्‌दिष्टे:

अ. भारतीयांना कॉमनवेल्थमध्ये सहभागी होण्यास आवडेल की पूर्णपणे स्वतंत्र राहण्यास आवडेल, हे जाणून घेणे.

आ. भारतीयांच्या हाती सत्ता सोपविण्याची साधने अधोरेखित करणे.

इ. काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांच्यातील तंट्याचे निराकरण करून ब्रिटिश सत्ता एकेरी भारतीय प्रशासनाकडे सुपूर्द करणे.

## *संविधान सभेची निर्मिती व रचना:

## (Creation and composition of the Constituent Assembly)

**कॅबिनेट प्लॅन मधील तरतुदींमध्ये संविधान सभेची रचना पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आली.**

1) संविधान सभेत एकूण ३८९ सदस्य असतील. त्यांपैकी २९२ सदस्य ब्रिटिश प्रांतांकडून निवडून दिले जातील, ४ सदस्य चीफ कमीशनरच्या प्रांतांकडून (दिल्ली, अजमेर मारवाड, कुर्ग व बलुचिस्तान) निवडून दिले जातील, तर ९३ सदस्य भारतीय संस्थानिकांचे प्रतिनिधी असतील.

2) संविधान सभेच्या सदस्यांची निवडणूक प्रत्यक्षपणे प्रौढ मतदानाच्या आधारे करणे ही वेळखाऊ प्रक्रिया असल्याने, सदस्यांच्या निवडनुका अप्रत्यक्षपणे 'एकल संक्रमणीय मताद्‌वारे प्रमाणशीर

प्रतिनिधीत्वाच्या' पद्धतीने केल्या जातील. हे सदस्य १९३५ च्या कायद्यानुसार नुकत्याच स्थापन करण्यात आलेल्या प्रांतिक कायदेमंडळांच्या सदस्यांकडून निवडून दिले जातील.

3) साधारणतः १० लाख लोकसंख्येमागे एक सदस्य, असे प्रमाण राखण्यात येईल. सर्व समुदायांना प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी जागांचे विभाजन तीन प्रमुख गटांमध्ये केले जाईलः शिख, मुस्लिम व साधारण.

• निवडणुकापुढीलप्रमाणे घेण्यात आल्या.

ब्रिटिश प्रांतांना देण्यात आलेल्या २९६ जागांसाठी निवडणुका जुलै-ऑगस्ट १९४६ मध्ये घेण्यात आल्या. काँग्रेसने त्यांपैकी २०८ जागा (केवळ ९ जागा वगळता सर्व साधारण जागा) मिळविल्या. मुस्लिम लिगने ७३ जागा (केवळ ५ जागा वगळता सर्व मुस्लिम जागा) मिळविल्या. उर्वरित १५ जागांमध्ये प्रत्येकी एक जागा युनियनिस्ट पार्टी, युनियनिस्ट मुस्लिम, युनियनिस्ट शेड्यूल्ड कास्ट, कृषक प्रजा पार्टी, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन, शिख (गैर-काँग्रेस), आणि कम्युनिस्ट या पक्षांना मिळाली, तर ८ जागा अपक्षांना मिळाल्या. एकूण जागांपैकी १५ जागा महिलांना मिळाल्या.

• संस्थानिकांच्या ९३ जागा मात्र भरल्या जाऊ शकल्या नाही, कारण संस्थानिकांनी संविधान सभेत भाग न घेण्याचा निर्णय घेतला.

• अशा रीतीने, संविधान सभा जरी प्रत्यक्ष प्रौढ मतदानाच्या आधारावर निवडण्यात आली नाही तरी, भारतीय समाजाच्या सर्व गटांना, तिच्यात प्रतिनिधित्व मिळालेः हिंदू, मुस्लिम, शिख, पारसी, अँग्लो-इंडियन, भारतीय ख्रिश्चन, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला इत्यादी. महात्मा गांधी व मुहम्मद अली जीना वगळता तत्कालिन भारतातील जवळजवळ सर्व प्रमुख, महत्वाचे व अनुभवी व्यक्तीमत्वे संविधान सभेचे सदस्य होते.

## *घटना समितीची पहिली बैठक :

**(First meeting of Constitution Committee)**

• सोमवार, दि. 9 डिसेंबर 1946 रोजी सकाळी ठीक 11 वाजता नवी दिल्ली येथील काउन्सिल हॉल (सध्या हे सभागृह संसदेचा सेन्ट्रल हॉल या नावाने परिचित आहे) मध्ये भरली. याच दिवसापासून घटना समितीचे पहिले अधिवेशन आणि कामकाजदेखील सुरू झाले.

• या बैठकीवर मुस्लीम लीगने बहिष्कार घातल्यामुळे आणि संस्थानांच्या प्रतिनिधींची निवड झालेली नसल्यामुळे पहिल्या बैठकीला एकूण 296 सदस्यांपैकी केवळ 208 सदस्य उपस्थित होते. यामध्ये 10 महिला सदस्यांचाही समावेश होता. त्या पुढीलप्रमाणे (1) अम्मू स्वामिनाथन (2) दक्षयानी वेलायुदन (3) दुर्गाबाई देशमुख (4) हंसा मेहता (5) कमला चौधरी(6) लीला रे (7) मालती चौधरी (8) पूर्णिमा बॅनर्जी (9) सरोजिनी नायडू (10) सुचेता कृपलानी इत्यादी.

• घटना समितीची बैठक पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आमंत्रित केली होती.

• घटना समितीला ब्रिटिश सरकारने शुभेच्छा संदेश पाठविला नव्हता. या सभेला केवळ अमेरिका ('From the Acting Secretary of State, Washington, D. C.), चीन (WANG SHIH CHIEH, Minister of Foreign Affairs of the Republic of China.) आणि ऑस्ट्रेलिया (from the Australian Government) या तीन देशांनीच शुभेच्छा संदेश पाठविले होते.

• संविधान सभा किंवा घटना समितीच्या बैठकीलापहिल्या रांगेत बसलेले सदस्य पंडित जवाहरलाल नेहरू, मौलाना अब्दुल कलाम आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, आचार्य जे. बी. कृपलानी, डॉ. राजेंद्र प्रसाद, सरोजिनी नायडू, हरे कृष्ण मेहताब, पंडित गोविंद वल्लभपंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरत चंद्र बोस, सी. राजगोपालाचारी आणि एम. असफ अली इत्यादी.

• घटना समितीच्या बैठकीचे प्रास्ताविक डॉ. सचिदानंद सिन्हा यांनी केले. ते समितीतील सर्वांत ज्येष्ठ सदस्य (तसेच सर्वांत ज्येष्ठ संसदपटू) असल्याने काँगेस पक्षाचे तत्कालीन अध्यक्ष आचार्य जे. बी. कृपलानी यांनी फ्रेंच व्यवहाराला अनुसरून त्यांना घटना समितीचे हंगामी अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळण्याची विनंती केली.

• घटना समितीमध्ये ख्रिश्चन, आंग्ल-भारतीय (अँग्लो-इंडियन) आणि अल्पसंख्य समुदायांचा देखील समावेश होता.

• घटना समितीला पहिल्यांदा संबोधित जे. बी. कृपलानी यांनी केले.

## ⁕घटना समितीचे कामकाज:

**(Functioning of Constitution Committee)**

1) **1 ले अधिवेशन (9 ते 23 डिसेंबर 1946**)

• 9 डिसेंबर : सचिदानंद सिन्हा यांची घटना समितीचे हंगामी अध्यक्षपदी निवड केली त्यानंतर सिन्हा यांनी फ्रैंक ॲथोनी यांची उपाध्यक्षपदी निवड केली; घटना समिती सदस्य प्रसन्न देब रायकुट यांच्या निधनावर शोक व्यक्त केला व अध्यक्षांच्या निर्वाचनासंबंधी नियमाचा ठराव मांडला गेला.

• 11 डिसेंबर : घटना समितीच्या स्थायी अध्यक्षपदी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची निवड (निर्वाचन), तसेच सर बी. एन. राउ (सर बेनेगल नर्सिंग राउ) यांची घटना समितीचे सांविधानिक सल्लागारपदी नियुक्ती केली गेली.(ते घटना समितीचे सदस्य नव्हते);

• 13 डिसेंबर : पं. जवाहरलाल नेहरू यांनी 'उद्‌दिष्टांचा ठराव' मांडला;

[टीप - घटना समितीच्या पहिल्या दिवशी (9) डिसेंबर रोजी) एकूण 208 सदस्य (10 महिला सदस्यांसह) उपस्थित होते तर पहिल्या अधिवेशनाला (9 ते 23 डिसेंबर) एकूण 211 सदस्य (10+2=12 महिला सदस्यांसह) उपस्थित होते.]

**2) 2 रे अधिवेशन (20 ते 25 जानेवारी 1947)**

• 22 जानेवारी : उद्‌दिष्टांचा ठराव संमत करण्यात आला; वाटाघाटी करणाऱ्या समितीमध्ये भूतान आणि सिक्कीमचा समावेश करण्याचा ठराव अन् घटना समितीचे पहिले 'बजेट' मांडले.

• 24 जानेवारी : सल्लागार समितीची स्थापना; घटना समितीचे पहिले 'अंदाजपत्रक' (बजेट) संमत करण्यात आले.

• 25 जानेवारी : एच.सी. मुखर्जी यांची घटना समितीच्या उपाध्यक्षपदी अध्यक्षांकडून नियुक्ती; बिझनेस समितीची स्थापना; केंद्र (संघ) अधिकार समितीची स्थापना; (टीप - घटना समितीच्या पहिल्या दोन अधिवेशनांना मुस्लीम लीग आणि भारतीय संस्थानांचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते.)

**3) 3 रे अधिवेशन (28 एप्रिल ते 2 मे 1947)**

28 एप्रिल : कूर्गच्या विधानपरिषदेने आपल्या चीफ कमिशनर मार्फत घटना समितीला शुभेच्छा संदेश पाठविला;

या तिसऱ्या अधिवेशनामध्ये मूलभूत हक्कावर प्रामुख्याने चर्चा झाली.

• 30 एप्रिल : बिझनेस समितीच्या अहवालानुसार संघ संविधान समिती आणि प्रांतीय संविधान समिती वा दोन समित्यांची स्थापना स्थापना झाली.

**4) 4 थे अधिवेशन (14 ते 31 जुलै)**

• 14 जुलै : डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना समितीवर सुरुवातीला बंगालमधून निर्वाचित झाले होते. परंतु त्या प्रांताचे विभाजन झाल्यामुळे त्यांचे सदस्यत्व संपुष्टात आले. पुढे बॉम्बे प्रांतातून त्यांची पुन्हा घटना समितीवर निवड करण्यात आली. त्यांनी दुसऱ्यांदा घटना समितीच्या रजिस्ट्रारमध्ये आपल्या नावाची नोंद करून स्वाक्षरी केली.

• 16 जुलै : घटना समितीकरीता 02 उपाध्यक्षांची निवड करायची असल्याने या दिवशी एच. सी. मुखर्जी आणि व्ही. टी. कृष्णम्माचारी या दोघांची निवड करण्यात आली.

• 22 जुलै : पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताचा राष्ट्रध्वज (स्वराज ध्वज) स्वीकारण्याविषयी प्रस्ताव मांडला. यावेळी एच. व्ही. कामत (चक्रामध्ये स्वस्तिक नमूद करणे), ताज्मुल हुसैन आणि पी. एस. देशमुख या 3 सदस्यांनी प्रस्तुत राष्ट्रध्वजामध्ये दुरुस्त्या सुचविल्या होत्या, पण नेहरूंच्या भाषणानंतर संबंधित सदस्यांकडून त्या मागे घेण्यात आल्या तर काही समिती सदस्यांनी फेटाळल्या. घटना समितीने रेशमी आणि कॉटन खादी अशा दोन कपड्यांवरील तिरंगी (केशरी, पांढरा आणि हिरवा) ध्वज स्वीकारला. मधल्या पांढऱ्या रंगाच्या पट्टीवर सारनाथ येथील अशोक चक्र (24 आऱ्या असलेले) गडद निळ्या (नेव्ही ब्लू) रंगात स्वीकारण्यात आले. चक्राचा व्यास पांढऱ्या पट्टीच्या रुंदीएवढा असेल. ध्वजाची रुंदी व लांबी प्रमाण 2:3 आहे. थोड्या फरकाने पण अशाच स्वरूपाचा ध्वज 1923 साली वापरण्यात आला होता आणि तो पिंगली वेंकय्या (Pingali Venkayya) यांनी आरेखित (Design) केला होता.

• स्वतंत्र भारताचा ध्वज श्रीमती सुरिया बद्र-उद-दीन तैयब (Mrs. Suriaya Badr-ud-Din Tyab) यांनी आरेखित केला होता आणि राष्ट्र ध्वजाबाबतच्या तदर्थ समितीने तो 17 जुलै 1947 रोजी संमत आणि स्वीकृत केला. औपचारिकपणे स्वातंत्र्य घोषित होण्यापूर्वी 24 दिवस आधी राष्ट्रध्वज स्वीकारण्यात आला. 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताबाहेर राष्ट्रध्वज पहिल्यांदा ऑस्ट्रेलियामध्ये भारताचे उच्चायुक्त रघुनाथ परांजपे यांनी फडकाविला.

**5) 5 वे अधिवेशन (14 ते 30 ऑगस्ट 1947)**

• 14 ऑगस्ट : सुचेता कृपलानी यांनी 'वंदे मातरम्' या गीताचे पहिले धृवपद गायिले; घटना समितीतील सर्व सदस्यांनी रात्री 12 वाजता 'भारतीय लोकांच्या सेवेप्रति'ची शपथ घ्यावी, असा प्रस्ताव पंडित नेहरूंनी मांडला व तो संमत झाला; देशाच्या राज्यकारभाराची संपूर्ण जबाबदारी घटना समितीने स्वीकारली आणि 15 ऑगस्ट पासून लॉर्ड माउंटबॅटन भारताचे गव्हर्नर जनरल म्हणून जबाबदारी सांभाळतील, असा ठराव करण्यात आला.• ध्वज सादरीकरण समितीच्या एकूण 74 सदस्या होत्या.

**6) 6 वे अधिवेशन (27 जानेवारी 1948)**

• या दिवशी म्हैसूर प्रांताचे दोन तर इंदोर प्रांताच्या एका प्रतिनिधीची घटना समितीवर निवड; पश्चिम बंगाल आणि पूर्व पंजाबला अधिक प्रतिनिधित्व देण्याचा प्रस्ताव मंजूर;

• सुचेता कृपलानी यांनी 'सारे जहाँसे अच्छा हिंदोस्तां हमारा' या गीताच्या काही ओळी आणि 'जन गण मन अधिनायक जय हे' या राष्ट्रगीताचे धृवपद गायिले.

• 15 ऑगस्ट : गव्हर्नर जनरलच्या हस्ते घटना समिती सदनावर तिरंगा फडकाविला.

• 29 ऑगस्ट : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह 7 सदस्यांची मसुदा समिती गठीत करण्यात आली.

कायदेमंडळीय कामकाजासाठी अधिवेशन संपविण्यात आले.

7) 7 वे अधिवेशन (4 नोव्हेंबर 1948 ते 8 जानेवारी 1949):

• 4 नोव्हेंबर : विविध प्रांतांतील 11 सदस्यांची घटना समितीवर निवड; मोहम्मद अली जीना, डी. पी. खैतान आणि डी. एस. गुरंग यांना श्रद्धांजली; डॉ. आंबेडकरांनी 'मसुदा राज्यघटना' (Draft Constitution) समितीपुढे सादर केली;

• मसुदा राज्यघटनेचे पहिले वाचन (सर्वसाधारण वर्चा) सुरू;

• मसुदा राज्यघटनेचे दुसरे वाचन (प्रत्येक कलमानुसार) सुरू;

• या अधिवेशनात सर्व चर्चा प्रामुख्याने 'मसुदा राज्यघटनेतील' तरतुदींवर झालेली दिसते.

**8) ८ वे (१६ मे ते १६ जून १९४९)**

• 16 मे : 3 सदस्यांची घटना समितीवर निवड; सरोजिनी नायडू यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

• या अधिवेशनातही सर्व चर्चा प्रामुख्याने 'मसुदा राज्यघटनेतील' तरतुदींवर झालेली दिसते.

**9) 9 वे अधिवेशन (30 जुलै ते 18 सप्टेंबर 1949):**

• या अधिवेशनातही सर्व चर्चा प्रामुख्याने 'मसुदा राज्यघटनेतील' तरतुदींवर आणि अनुसूचींवर झालेली दिसते.

**10)10 वे अधिवेशन (6 ते 17 ऑक्टोबर 1949):**

• 17 ऑक्टोबर : राज्यघटनेची उद्देशपत्रिका / सरनामा यावर चर्चा, प्रस्ताव स्वीकार आणि तिचा राज्यघटनेमध्ये समावेश करण्यात आला; मसुदा राज्यघटनेचे दुसरे वाचन पूर्ण.

• दुसऱ्या वाचनात सुचवण्यात आलेल्या एकूण 7,635 दुरुस्त्यांपैकी 2,473 दुरुस्त्यांवर चर्चा झाली आणि त्या निकाली काढल्या.

**11)11 वे अधिवेशन (14 ते 26 नोव्हेंबर 1949)**

• 14 नोव्हेंबर : मसुदा राज्यघटनेचे तिसरे वाचन सुरू;

26 नोव्हेंबर : मसुदा राज्यघटनेचे तिसरे वाचन पूर्ण;

घटना समितीने 'भारतीय राज्यघटनेचा' ठरावाद्वारे अधिकृतपणे स्वीकार केला; यावेळी अध्यक्षांनी मसुदा राज्यघटनेवर स्वाक्षरी केली. अन्य सदस्यांच्या स्वाक्षरीसाठी जानेवारीमध्ये आणखी एक अधिवेशन बोलावण्यात आले.या अधिवेशनात मसुदा घटनेवरील 3 रे वाचन, काही दुरुस्त्या यावर चर्चा झाली.

### *घटना समितीची बैठक (24 जानेवारी 1950):

• या दिवशी रत्नाप्पा कुंभार (बॉम्बे स्टेट) आणि डॉ. वाय. एस. परमार (हिमाचल प्रदेश) यांची घटना समितीवर निवड झाली. (कदाचित घटना समितीवर सर्वांत शेवटी निवड झालेले हेच सदस्य आहेत, असे म्हणता येईल).

• राष्ट्रगीताचा निर्णय ठरावाद्वारे मतदान करून घेण्यात यश आले नाही म्हणून तो अध्यक्षांवर सोपविण्यात आला होता. या दिवशी अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी 'जन गण मन' हे राष्ट्र गीत (National Anthem) आणि समान दर्जाचे 'वंदे मातरम्' हे राष्ट्र गान (National Song) असेल, असे जाहीर केले.

• या दिवशी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची भारताच्या राष्ट्रपतीपदी बिनविरोध निवड झाली. याबाबतचा प्रस्ताव पं. नेहरू यांनी मांडला तर त्याला सरदार पटेल यांनी अनुमोदन दिले. एच. व्ही. आर. अगर हे वा निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी आणि घटना समितीचे सचिवदेखील होते. त्यांनी राजेंद्रप्रसाद यांच्या नावाची घोषणा केली.

• यावेळी सदस्यांच्या स्वाक्षरीसाठी राज्यघटनेच्या 3 प्रती ठेवण्यात आल्या होत्या.

1. इंग्रजी हस्ताक्षरातील आणि कलाकारांनी काम केलेली.

2. इंग्रजीतील प्रतीची नक्कल प्रत. आणि

3. हिंदी हस्ताक्षरातील प्रत इत्यादी.

• पंतप्रधान पंडित नेहरू यांनी सदस्य म्हणून घटनेच्यातिन्ही प्रतींवर पहिल्यांदा स्वाक्षरी केली. सर्वांत शेवटी अध्यक्षांनी सह्या केल्या.

• बैठकीच्या शेवटी पूर्णिमा बॅनर्जी यांनी 'जन गण मन' गायिले तर पंडित लक्ष्मीकांत मैत्र यांनी 'वंदे मातरम्' गायिले.

• उपस्थित व स्वाक्षरी केलेल्या सदस्यांची संख्या 299 पैकी 284 सदस्य उपस्थित होते व त्यांनी राज्यघटनेवर स्वाक्षरी केली.

## *मसुदा समिती :( drafting committee)

• सर्व समित्यांमध्ये सर्वांत महत्त्वाची मसुदा समिती. 29 ऑगस्ट 1947 रोजी म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पार पडलेल्या 5 व्या अधिवेशनामध्ये गठीत.

• मसुदा समितीची पहिली बैठक 30 ऑगस्ट 1947 रोजी पार पडली. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची या समितीच्या अध्यक्षपदी निवड झाली.

• घटना समितीचे घटनात्मक सल्लागार बी. एन. राव.यांनी ऑक्टोबर 1947 मध्ये मसुदा घटना तयार केली होती. त्यात 243 कलमे आणि 13 अनुसूची होत्या. मसुदा समितीने या मजकुराची चिकित्सा करण्यास ऑक्टोबर 1947 मध्ये सुरुवात केली व त्यात अनेक बदल केले.

• 21 फेब्रुवारी 1948 रोजी मसुदा समितीने मसुदा राज्यघटना घटना समिती अध्यक्षांना आणि समितीला सादर केली. यावेळी वितरीत केलेल्या मसुदा राज्यघटनेवर घटना समिती आणि समिती बाहेर देशभरात चर्चा सुरू झाली. या मसुदा राज्यघटनेत 315 कलमे आणि 8 अनुसूची होत्या.

• मसुदा राज्यघटनेसाठी एकूण 7,635 दुरुस्त्या प्रस्तावित होत्या, त्यापैकी केवळ 2,473 दुरुस्त्यांचे प्रस्ताव घटना समितीत मांडण्यात आले.

• मूळ समितीमध्ये एकूण 7 सदस्य (अध्यक्षासहित) होते

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर (समितीचे अध्यक्ष)

2. एन. गोपालस्वामी अय्यंगार (काँग्रेस)

३. डॉ. के. एम. मुंशी (काँग्रेस)

4. सईद मोहम्मद सादुल्ला (मुस्लीम लीग)

5. अल्लादी कृष्णस्वामी अय्यर (अपक्ष)

6. बी. एल. मित्तर (अपक्ष)

7. डी. पी. खैतान (अपक्ष)

• मसुदा समिती सदस्यांमध्ये झालेला बदल -1. बी. एल. मित्तल यांनी आजारपणामुळे राजीनामा दिला. त्यांच्या जागी एन. माधव राऊ यांची नियुक्ती केली गेली.

2. डी. पी. खैतान यांचे 1948 मध्ये निधन झाल्यामुळे त्यांच्या जागी टी. टी. कृष्णम्माचारी (काँग्रेस) यांची नियुक्ती करण्यात आली.

• मसुदा राज्यघटनेची 3 वाचने:

पहिले वाचन 4 नोव्हेंबर ते 9 नोव्हेंबर 1948.

2. दुसरे वाचन 15 नोव्हेंबर 1948 ते 17 ऑक्टोबर 1949

3. तिसरे वाचन 14 नोव्हेंबर ते 26 नोव्हेंबर 1949

• मसुदा राज्यघटनेचा विचार करण्याकरिता 114 दिवस लागले.

• 26 नोव्हेंबर 1949 रोजी मसुदा राज्यघटना संमत आणि स्वीकृत करण्यात आली.

• उपरोक्त नमूद केलेल्या जबाबदाऱ्यांशिवायही घटना समितीने पुढील कार्ये पार पाडली -

1. 22 जुलै 1947 रोजी राष्ट्रध्वजाचा स्वीकार केला.

2. मे 1949 मध्ये राष्ट्रकुलातील (कॉमनवेल्थ) भारताच्या सदस्यत्वाला मान्यता दिली.

3. 24 जानेवारी 1950 रोजी राष्ट्रगीताचा स्वीकार केला गेला.

## *डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार :

## (Dr. Babasaheb Ambedkar, Architect of Indian Constitution)

आंबेडकर मसुदा घटनेच्या विविध कलमांच्या तपशीलवार चर्चेच्या वेळी सभासदांकडून विचारल्या जाणाऱ्या शंकांना उत्तरे देणे, त्यांनी मांडलेल्या दुरुस्त्या नाकारताना त्यासाठी स्पष्टीकरण देणे आणि मसुद्यातील मजकुराची सूक्ष्म तपासणी करून तो बिनचूक करण्याचे अवघड कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पार पाडले, म्हणून त्यांना दिलेली 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' ही उपाधी सार्थ ठरते.

## *घटनेचा अंमल (Enforcement of the Constitution):

## (Execution of the Constitution)

घटनेचा अंमल २६ जानेवारी, १९५० पासून सुरू झाला. (हा दिवस निवडण्याचे कारण म्हणजे डिसेंबर, १९२९ च्या काँग्रेसच्या लाहोर अधिवेशनातील पूर्ण स्वराज्य ठरावानुसार २६ जानेवारी, १९३० हा दिवस भारताचा प्रथम स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करण्यात आला होता.) २६ जानेवारी, १९५० हा दिवस 'घटनेच्या प्रारंभाचा दिन' म्हणून ओळखण्यात येतो व 'गणराज्य दिन' म्हणून साजरा केला जातो.

मात्र घटनेच्या कलम ३९४ नुसार, घटनेतील १६ कलमांचा अंमल २६ नोव्हेंबर, १९४९ रोजीच सुरू झाला. उदा. कलम ५, ६, ७, ८, ९, ६०, ३२४, ३६६, ३६७, ३७२, ३७९, ३८०, ३८८, ३९१, ३९२ आणि ३९३ या कलमांमधील नागरिकत्व, निवडणूका, तात्पुरती संसद, तात्पुरत्या तरतुदी आणि लघु शिर्षक यांबद्दलच्या तरतुदी.

अशा रीतीने, ६४ लाख रूपये खर्च करून २ वर्षे, ११ महिने आणि १८ दिवसांच्या कालावधीत घटना तयार करण्यात आली. या कालावधीत संविधान सभेची ११ सत्रे झाली. त्यांपैकी ४ सत्रे स्वातंत्र्यापूर्वी तर ७ सत्रे स्वातंत्र्यानंतर झाली. ११ सत्रांदरम्यान संविधान सभेने १६६ दिवस काम केले, त्यापैकी ११४ दिवस घटनेच्या मसुद्यावर चर्चा करण्यासाठी वापरण्यात आले. तसेच घटनाकर्त्यांनी जगातील सुमारे ६० देशांच्या घटनांचा विचार केला. याप्रमाणे संविधान सभा व मसुदा समितीच्या उत्कृष्ट कामकाजामुळे जगातील सर्वात मोठी व लिखित राज्यघटना निर्माण होण्यास मदत झाली.